# मराठी मंडळातून फेरफटका

**मॉन्ट्रीयाल (कॅनडा)** मराठी मंडळात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सहकार्याने 'गाभ्रीचा पाऊस' , 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' हे दोन चित्रपट दाखवण्यात आले. यांस ३३ सिनेरसिक उपस्थित होते.

**वॉशिंग्टन डी.सी.** मधील काही महिलांनी IndiToy कंपनी सुरु केली असून त्याद्वारे मुलांना मराठी, हिंदी भाषा शिकण्यास सुलभ मार्ग उपलब्ध करून दिला आहे. अधिक माहिती: http://www.inditoy.com/

**कॅलिफोर्नियाच्या** 'कला' या संस्थेने अलिकडेच बे एरियात 'हरिश्चन्द्राची फॅक्टरी' हा चित्रपट दाखवला. जराशा वेगळ्या धाटणीचा एखादा नवीन हिंदी चित्रपट आला की लोक त्याला डोक्यावर घेतात. नेहमीच पनीरची भाजी खायची सवय असलेल्यांना भरलं वांगं मिळालं तर दुसरं काय होणार म्हणा. पण मराठी सिनेजगत् मात्र तसे नव्हे. आम्हाला सवयच झालीये भरल्या वांग्याची. मराठी सिनेजगत् म्हणजे आगळ्यावेगळ्या विषयांवरच्या, निराळी मांडणी असलेल्या चित्रपटांची 'फॅक्टरीच' आहे. भारतीय चित्रपटांचे जनक, दादासाहेब फाळके यांच्यावर आधारित चित्रपट 'हरिश्चन्द्राची फॅक्टरी' असाच वैशिष्ट्यपूर्ण आहे. दर्जेदार चित्रपट पहाण्यासाठी आम्ही परदेशस्थ रसिक आतुरतेने वाट बघत असतो. याचे श्रेय 'कला' किंवा बृहन्महाराष्ट्र मंडळ यांसारख्या संस्थांना जाते. उत्तर अमेरिकेत मराठी संस्कृती आणि कला जतन करण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. मराठी रसिकजन कुठल्याही दर्जेदार कार्यक्रमाला आवर्जून हजर राहून प्रतिसाद देतात. त्यामुळे साहजिकच बे एरियात 'हरिश्चन्द्राची फॅक्टरी'चे दोन्ही प्रयोग हाऊसफुल्ल होते.

चित्रपट सुरु होतो तो हरिश्चन्द्राच्या कथेपासून. प्रोफेसर केळफ्यांचे जादूचे प्रयोग चित्रपटाच्या प्रेक्षकांना खिळवून ठेवतात. अनेक सामाजिक आणि आर्थिक अडचणींवर मात करत काढलेल्या पहिल्या चलचित्राची कथा परेश मोकाशी यांनी हसत खेळत आणि सुरेख रंगवली आहे. जुन्या मूकचित्रपटांच्या आठवणींना उजाळा देत रंगवलेला हा सिनेमा अलगद प्रेक्षकांच्या मनावर मोहिनी घालतो. पडद्यावरचे फाळके सजीव होतात आणि आपले हात धरून आपल्याला त्यांच्या या चित्रमय प्रवासात घेऊन जातात. आपण त्यांच्या बरोबर हसतो, त्यांच्या कारुण्याचे आणि खडतर प्रवासाचे सहप्रवासी होतो, त्यांना परिवाराकडून मिळणारा पाठींबा बघून सद्गदित होतो आणि शेवटी त्यांच्या हातातल्या हलत्या खेळण्यावर क्षणभर स्थिरावतो. प्रयोग संपतो पण प्रेक्षक खुर्चीला खिळलेले असतात. 'राजा हरिश्चंद्र' च्या प्रेक्षकांनाही असेच काहीसे वाटले असणार.

चित्रपट बघून परतले तरी मनात हरिश्चंद्र अजूनही पिंगा घालत होता. दुसऱ्या दिवशी मुलीला माझ्या ताब्यात देऊन, नवरा पुढच्या प्रयोगाला गेला. आल्यावर मग आमची चर्चा झाली. विचार केला की हाच चित्रपट DVD वर येईपर्यंत न थांबता, मुलीच्या वेळा सांभाळत चित्रपटगृहातच जाऊन बघण्याचा अट्टाहास का? वास्तविक असे चित्रपटगृहात जाऊन चित्रपट बघण्यातच खरी गंमत आहे. मोक्याच्या ठिकाणी छोट्याश्या चित्रपटगृहात प्रयोग असतात व उपस्थितांचे स्वागत करायला स्वयंसेवक जातीने हजर असतात. मोठ्या पडद्यावर चित्रपट बघायला मिळतात, काहीवेळा चित्रपटाशी संबंधित व्यक्ती खास भारतातून येऊन चित्रपटाबद्दल माहिती देतात, प्रयोगाला 'व्यसनेषुसाख्यम्' ... असे स्नेही भेटतात, गप्पा होतात, मध्यंतरात चहाचे घोट घेत चर्चासत्र रंगतात. ही मजा 'YouTube' वर किंवा DVD's वर चित्रपट बघण्यात कशी काय येणार?
भरलं वांगं ब्रेडबरोबर कसं काय खाणार?

**शिल्पा तोरवी (सॅन होसे, कॅलिफोर्निया)**

# वार्ता-मराठी संमेलनांची

## पहिले विश्व मराठी नाट्य संमेलन (न्यू जर्सी)

**मे २८-३१, २०१०रोजी** अत्याधुनिक नाट्यसंकुलात संपन्न होणार!
**नाट्य संमेलनाचे (बदलेले) स्थळ:** युनियन काऊंटी ऑफ परफॉर्मिंग आर्टस् सेंटर, 1601 Irving Street Rahway, NJ 07065
**अधिक माहिती:** http://www.vmns.org/

***

## दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन (दुबई)

गेल्या वर्षी सॅन होसे येथे पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन झाले होते. दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन यावर्षी ४ ते ६ मार्च दरम्यान दुबईत पार पडले. मंगेश पाडगावकर या संमेलनाचे अध्यक्ष आणि खास निमंत्रित म्हणून महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री छगन भुजबळ हजर होते. प्रत्येक दिवशी सुमारे ८०० लोकांचा श्रोतृवर्ग या संमेलनाला लाभला. अल आदिल या स्थानिक कंपनीचे मालक आणि मसाला किंग म्हणून प्रसिद्ध असलेल्या धनंजय दातारांनी या संमेलनाला मोठी देणगी दिली होती. त्यांच्यांसमवेत झालेला 'मानापमान' नाटकाचा 'प्रयोग'ही प्रसिद्धी माध्यमातून चांगलाच रंगला! आयोजकांना वेळेवर नियंत्रण ठेवणे न जमल्याने प्रत्येक कार्यक्रम तासभर तरी उशीरा चालू झाला. पहिल्या दिवशी उद्घाटन समारंभातली सर्व भाषणे खूपच लांबली. त्यातल्या त्यात भुजबळांच्या रटाळ भाषणाने फारच वैताग आणला. दातारांनी आपल्या कर्तृत्वाचा आलेखच सादर केला. नांदीनिमित्त आयोजित केलेले रंजना फडके यांचे नृत्य सादर झालेच नाही. फडकेबाई चार तास रंगपटात मेकअप लावून बसल्या होत्या. पूर्वनियोजित कार्यक्रम असा रद्द झाल्यामुळे दातारांनी याचे सर्व खापर साहित्य महामंडळाचे अध्यक्ष ढाले पाटील यांच्यावर खास वार्ताहर परिषद घेऊन फोडले. शेवटी दातारांची माफी मागून समजूत काढण्यात आली.

पाडगावकरांनी अध्यक्षीय भाषण दहा मिनीटात संपवले. त्यांची प्रगट मुलाखत मात्र तासभर चांगलीच रंगली. दुसरे दिवशी पुस्तकांची दिंडी मात्र जोरात झाली पण त्यामुळे वेळापत्रक मात्र कोलमडले. ५० वर्षांचा नाट्यसृष्टीचा इतिहास छान चित्रफितीद्वारे दाखवला गेला. 'संतवाङमय हे बदलत्या कालानुरुप आहे का' या विषयावरचा परिसंवाद सर्वात जास्त रंगला. शंकर अभ्यंकरांनी या कार्यक्रमाचं उत्कृष्टपणे केलेलं सूत्रसंचालन त्यांच्या विद्यावाचस्पती